The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# शेख महंमद यांच्या साहित्यातील समन्वयवादी व समतावादी विचार

**प्रा. डॉ.भास्कर वि.नरवाडे**

मराठी विभाग, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि.लातूर

मध्ययुगीन मराठी साहित्याचे दालन विविध पंथाच्या, संप्रदायाच्या व धर्माच्या संतकवींनी समृध्द व संपन्न केले आहे. महानुभाव-वारकरी-नाथ संप्रदायाप्रमाणेच मुस्लिम मराठी संताचे योगदान सुध्दा तितकेच महत्वाचे असून मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम संतकवींनी धार्मिक ऐक्य सामाजिक सहिष्णुता व समता या विचारांची पेरणी आपल्या लिखानातून केली आहे. याचा परिणाम असा झाला की, त्यांचे साहित्य व त्यांनी केलेले कार्य हे जनमाणस घडविण्यात अत्यंत उपयोगी व विधायक ठरले. कारण सर्वच मुस्लिम मराठी संत हे धर्मानं मुसलमान असूनही मनाने मात्र मराठी मातीशी, संस्कृतिशी व तितकेच मराठी भाषेशी एकरुप झाले होते. याचे उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे जवळपास सर्वच मुस्लिम संतकवींनी अल्ला बरोबरच पंढरपूरच्या विठ्ठलाला आपले श्रध्दास्थान मानले होते. यासंदर्भात मुस्लिम संत साहित्याचे अभ्यासक डॉ.यु.म. पठाण म्हणतात "सूफिंनी व अन्य मुस्लिम संतकवींनी इथल्या मातीशी एकरुप होऊन दोन्ही धर्माच्या अनुयायात सुसंवाद साधण्याचा केलेला प्रयत्न, राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे." राष्ट्रीय एकात्मतेबरोबरच संत ज्ञानेश्वर, चक्रधर स्वामी प्रमाणेच मराठी भाषेचे संवर्धन व संगोपन आणि मराठी भाषेचा अभिमान वाळगून अव्दैत तत्वज्ञानाचे निरुपण करणारी रचना त्यांनी मराठी भाषेत केलेली आहे. इ.सं १५व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत संत आलमखान, शहा, मुंतोजी ब्राह्मणी उर्फ मृत्यूजंय, हुसेन आंबरखान, शेख महमंद शहामुनी, शेख सुलतान, चाँदसाहेब कादरी, शहानवरंग यासारख्या जवळपास ५० मुस्लिम मराठी संतकवींची नावे नोंदवता येतील. 'कबीर, मोमीन लतिफा मुसलमान' यासारख्या ओळीतून संत तुकारामांनी आपल्या अभंगातून अनेक मुसलमान संताचा उल्लेख केलेला आहे

आज समकालीन वातावरणात सर्वच मुस्लिमांकड एका संशयी दृष्टीने पाहिले जात आहे. याही वातावरणात कबीर महाराज अतार, पुण्याचे साहिल शेख, धना महाराज सय्यद, जलाल महाराज सय्यद व ज्यांनी कीर्तन करता-करता शेवटचा श्वास घेतला ते ताजुद्यीन महाराज शेख यासारख्या २० ते २५ समकालीन कीर्तनकाराची नावे सांगता येतीलकी जे २१ व्या शतकातही वारकरी कीर्तनकाराप्रमाणेच आपल्या कीर्तनातून संतांचा अव्दैत विचार मांडतात. याचाच अर्थ १५ व्या शतकात सुरू झालेली परंपरा आजही अखंडीत आहे. याच परंपरेतील मराठवाडयातील धारुर जि.बीड येथील शेख महमंद यांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी आयुष्य खर्ची घातले. संत मंडळीत त्यांचा उलेख 'कबीरचा अवतार' असा केला जातो. त्यांचे पिता म्हणजे राजे महमंदाकडे धारुरच्या किल्याची हवालदारी होती. राजे महमंदाचा शिष्य चांदसाहेब कादरी म्हणजेच प्रख्यात हिंदू साधू चांद बोधले होते हे चांद बोधलेच शेख महमंदाचे गुरु होते. संत एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी आणि शेख महमंद हे गुरुबंधु होत. त्यांनीच 'योगसंग्रामात' आपल्या गुरुचा स्पष्ट उलेख केलेला आहे.

ॐ नमो जीसदगुरु चांद बोधले !
त्यांनी जनोपंता अंगी कारिलें
जानोबाने एका उपदेशिले दात्यत्वगुणे!

शेख महमंद हे कबिराच्या प्रवृतीचे असल्यामुळे त्यांनी समाजातील अंधश्रध्दा, अनिष्ठ चालीरितीवर आपल्या साहित्यातून आसूड ओढले. त्यांचा राम हा कबीराप्रमाणे व्यापक होता 'रामनव्हे दशरथी' असे त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे. ते व्यापक दृष्टी व समत्वबुध्दीने विचार करणारे संत होते. त्यामुळेच तत्कालीन मुसलमानांनी त्यांना हिंदू म्हणून काफीर म्हणावे व जन्माने मुसलमान असल्यामुळे हिंदूनीत्यांची निंदाच केली शेख महमदांनी हरि व अल्ला एकच असल्याचा विशेष बोध केला आहे.

आता अल्ला म्हणां वो तुम्ही
वाचे हरि म्हणता तुमचे काय वेंचे
हरि अल्ला न म्हणतील ते काचे अघोरी जाणारे

यासंदर्भात मुस्लिम संत साहित्याचे अभ्यासक डॉ. यु.म.पठाण संतसाहित्य नवचिंतन या ग्रंथात म्हणतात, "अल्ला आणि विठ्ठल ही एकच परमतत्वाची नाव आहेत हा विचार स्विकारुन शेख महमदांनी विपूल अंभग रचले" यावरुन असे लक्षात येते की, कोणत्याही धर्माची, पंथाची किंवा संताची व महापुरुषाची भूमिका ही स्वधर्मापुरती मर्यादीत व संकुचित असत नाही तर ती विश्वात्मकतेची असते. मानवतावादीअसते. याप्रमाणे शेख महंमद हे कधीच स्वधर्मप्रचारक नव्हते तर सर्वधर्मसमभाव बाळगणारे शांतीप्रिय असे संत होते. सामंजस्य हा त्यांचा स्थायिभाव असल्याकारणाने त्यांचे असंख्य हिंदू शिष्य होते ते मुसलमान न बनता शेवटपर्यंत हिंदूच राहिले शेख महमदांनी समाजातील मुलतत्ववादावर कठोर प्रहार केला. यासाठी त्यांची भूमिका ही कोणत्याही धर्मावर टीका करणारी नव्हती तर अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा, चालिरिती यावर त्यांनी टीका केली. सर्वसामान्यांना सन्मार्गाकडे आकर्षिक करण्यासाठी धार्मिक विचारही सहज-सोप्या पध्दतीने लोकभाषेत सांगितला पाहिजे हे त्यांनी ओळखले होते. पंधराव्या शतकात त्यांनी स्वधार्मियांचा व परधार्मियांचा विरोध पत्करुन समाज प्रबोधनाच काम पुढ नेलं. जनसामान्याचं प्रबोधन करण्यासाठी चक्रधर स्वामी व संत ज्ञानेश्वर यांच्या प्रमाणेच शेख महमदांनी लोकभाषेचा स्विकार केला.जे स्वत:ला धर्म पंडित समजतात. निष्फळ पोपटपंची करून लोकांना फसवतात. ख-या ज्ञानापासून लोकांना दूर नेतात त्यांच्या आचरणाविषयी शेख महमंद संताप व्यक्त करताना म्हणतात.

आपणास पंडित म्हणवणे!
मद्य-मासांचे भक्षण करणे
जगत्रय ठकिले भोदू चांडाळपणे!
मूर्ख, हीन मुठ म्हणती

या प्रमाणे रोखठोकपणे अशा भोंदूबाबावर प्रहार करतात. कारण परमेश्वर भक्ती ही नितळ आणि निर्मळ असावी अशी त्यांची धारणा होती. खरा आचार्य जोगी, सन्यांसी, काझी, मुलाणी, फकिर कोण असतो? याचे अनेक दाखले त्यांनी देऊन स्पष्ट केले आहे. चुकीच्या पध्दतीने धर्म सांगणा–या

तथाकथित धर्मपंडितावर ते कठोर शब्दात हल्ला चढवतात. यावेळी त्यांची भाषाही अतिशय रोखठोक संत तुकारामाच्या वळणाची बनते. ती अतिशय धारदार स्वरुप धारण करते. जसे

रांडे-सांडे आळशी झाले मांडे
तंत्रे मंत्रे जन ठकती काळतोंडे

शेख महंमदानी पुरोगामी व समतावादी विचार समाजात पेरण्यासाठी केलेले हे कालातीत स्वरुपाचे आहे. समाजाला विज्ञानवादी दृष्टीकोन देणारे ते संत आहेत. यासाठी लोकजीवनातील अनिष्ठ चालिरिती, प्रथा संपल्या पाहिजेत, त्यांचे उच्चाटन झाले पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न व काम केले. धर्माच्या नावावर चालणारे अर्थहीन, भावहीन कर्मकांड शुध्द परमार्थाशी विसंवादी असणारी आंधळी क्षुद्रदेवतोपासना आणि धार्मिक क्षेत्रातील दांभिकता यावर शेख महमदांचा मुख्य रोख होता. देवभोळेपणावर, कर्मवावादार त्यांनी सडकून टीका केली. चौफेर हला चढवला दगडात देव शोधणारे ते संत नव्हते. तर पुरोगामी व विवेकवादी दृष्टीने विचार करणारे ते संत होते. देवभोळेपणावर हल्ला चढवताना ते म्हणतात,

'देवता असत्या सामश्र्यपणे!
तर तोंडावर कां मुतती श्वाने!
'प्रसिध्द देखोनी झाकली अज्ञाने!!
कनिष्ठ भजन करिती'!!

तत्कालीन समाजातील खोडोबेडी, बगाड, इंगळाचे स्नान (शक्तीचे थोतांड) पशुबळी यांसारख्या अघोरी कृत्यावर त्यांनी टीका केली. लोकांना डोळस बनवले. देवदासी, मुरळयांच्या प्रथेवर मानवतावादी दृष्टीने विचार करुन या प्रथा, परंपरा किती अनिष्ठ आहेत स्त्रियांची कुचंबना करणा-या आहेत हे विचार त्यांनी पंधराव्या शतकात मांडले आहेत. त्यांच्या या विचारांची गरज २१ व्या शतकातही तितकीच आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण शेख महमदांची अध्यात्मिक भक्ती सोज्वळ, निर्मळ व प्रामाणिक आहे. पण त्याबरोबरच समाजातील अनेक अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा निष्फळ व निरर्थक गोष्टी सोडून दिल्या पाहिजेत अशी विज्ञानवादी व डोळस आहे. मूर्तीपूजा, नवस, सायास नरबळी यांसारख्या खुळचट चालिरीतीवर त्यांनी प्रहर करतांना तिर्थ यात्रा, होम-हवन, यावरही त्यांनी विचार मांडले आहेत.

पंढरीचा महिमा कोठे न दिसे आम्हा ! पापे होती जमा ! अनेक तिर्थी !!

सर्वसामान्यांचे दैवत असणा-या पंढरपूरच्या विठ्ठलावर त्यांची निस्सीम भक्ती होती. शेख महमदांची वाङ्मय निर्मिती मराठी, हिन्दी, उर्दू आणि फार्सी यासारख्या विविध भाषांमध्ये आहे. त्यांच्या समकालीन सर्व मुसलमान संतामध्ये शेख महमदांची रचना भारदस्त असून त्यात विविधता आहे. त्यांची ग्रंथसंपदा पुढील प्रमाणे आहे. पवन विजय, योगसंग्राम, निष्कलंक प्रबोध, वासुदेव, लळित, नसहितनामा, पंजीज मुसलमानी, आरती, स्फुटकविता, दोहरे, रुपके, अभंग व भारुडे यासारखी विविधांगी स्वरुपाची रचना शेख महमदांनी केली आहे.

एकूणच शेख महमदांचे कार्य व साहित्य जनमानस घडविण्यात अंत्यत महत्वाचे व विधायक स्वरुपाचे ठरले आहे. धार्मिक सहिष्णूता व धार्मिक ऐक्याचा विचार अतिशय प्रभावीपणे त्यांनी मांडला आहे.हे त्यांच्या अभंगावरून व कार्यावरून आपल्या सहज लक्षात येते

**निष्कर्ष -**

- शेख महमदांनी भारतीय समाजातील पाखंडीपणावर, अधंश्रध्दा, कालबाहय रुढी, प्रथा, परंपरावर आपल्या साहित्यातून व कृतीतून आसूड ओढले आहेत
- अन्य सूफी संताबरोबरच शेख महमदांनी महाराष्ट्रीय मातीशी एकरुप होऊन हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्माच्या अनुयायात सुसंवाद साधून राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात मौलिक भूमिका बजावली आहे.
- शेख महमदांचे साहित्य हे समन्वयशील व परिवर्तनवादी स्वरुपाचे आहे.
- शेख महमदांनी आपल्या विचाराचा जागर लोकभाषेत मांडला आहे. त्यांच्या भाषेत अस्सल मराठी म्हणी मोठया प्रमाणात आल्या आहेत. त्यांच्या साहित्यातील विचारांवर ज्ञानेश्वरीचा प्रभाव अद्‌यल्पाच्या प्रभावी खुणा पावलोपावली सापडतात.

**संदर्भ ग्रंथ -**

1) संपा, डॉ. गोरे, दादा : मराठी संताचे अभंग, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

2) डॉ. पठाण, यु.म. : संतसाहित्य नवचिंतन, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे

3) ढेरे रा. चिं. : मुसलमान मराठी संतकवी पद्मगंधा प्रकाशन, पुणे